तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **Email :** ropune.dte@gmail.com

जा. क्र.- तंशिविकापु/विवि/नवीन संस्था २०१६-१७/२०१६/567 दिनांक : ०९/०२/२०१६

प्रति
प्राचार्य / संचालक
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसाईक
अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय - शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून व्यावसाईक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत.....

संदर्भ — १) मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्र २/एनजीसी/नप्रत/२०१६/१६८ दिनांक ०४/०२/२०१६
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदेने प्रसिध्द केलेली **Adv.No.Approval/01(02)/2016**
३) संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसुचना क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१६/१५६ दिनांक ०१/०२/२०१६
४) संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसुचना क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१६/१६७ दिनांक ०४/०२/२०१६

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन संस्था सुरु करणे / संस्थाबंद करणे / नवीन अभ्यासक्रम सुरुकरणे /अभ्यासक्रम बंद करणे, /प्रवेश क्षमता वाढ करणे / प्रवेश क्षमता कमी करणे / संस्थेचे नवीन जागेत स्थलांतरण करणे /पी आय ओ/ एन आर आयच्या जागा, इंटीग्रेटेड अभ्यासक्रम, नावात बदल, महिलासाठींच्या संस्थाचे सर्वसाधरण संस्थेस रुपांतरण इ बाबत ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केलेले आहेत त्या अनुषंगाने मागर्दर्शक सुचना.

अ) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांचे मार्फत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युततर पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबतचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने दिनांक २१/०२/२०१६ पर्यत सादर करण्यासाठी संदर्भ क्र २ अन्वये जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. सदर जाहीरातीअन्वये परिषदेच्या अपुव्हल प्रोसेस हॅण्डबुक २०१६-१७ मधील मार्गदर्शक सुचनानुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक २१/०२/२०१६ पर्यत अर्ज करण्यास सुचित केले आहे.

सदर जाहिरातीस अनुसरुन संदर्भ क्रमांक ३ अन्वये व्यावसाईक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी परिषदेस सादर केलेल्या अर्जान्वर शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्याचे अनुषंगाने संचालनालयाच्या **www..dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०८ फेब्रुवारी २०१६ पासून लिक उपलब्ध करण्यात आलेली आहे. ती दिनांक २२/०२/२०१६ पर्यत माहिती भरण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरुन विना अनुदान तत्वावर पदवी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर /पदविकोत्तर पदविका या संस्थांनी प्रवेश क्षमता वाढ / घट /अभ्यासक्रम बंद करणे /नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /नवीन संस्था सुरु करणे / संस्था बंद करणे/ संस्थेचे नवीन जागेत स्थलांतरण करणे इत्यादी. स्वरुपाचे प्रस्ताव सादर केलेले असतील अशा संस्थांनी सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१३/प्र क्र ४३/तांशि ४ दिनांक २१/०८/२०१३ अन्वयें नोंदणी शुल्क निर्धारीत करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने नोंदणी शुल्क या कार्यालयास जमा करणे

आवश्यक आहे. **सदर नोंदणीशुल्क, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे, या नावे धनाकर्षाव्दारे काढून जमा करावे, ज्या संस्था नोंदणीशुल्क भरणार नाहीत अशा संस्थांच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषेद / वास्तूकला परिषेदकडे पाठविण्यात येणार नाही याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी व त्यास आपली संस्था सर्वस्वी जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी.**

- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नविन तंत्रशिक्षण संस्था सुरु करणे / संस्थेचे नवीन जागेत स्थलांतरण करणे, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दिनांक २२/०२/२०१६ पर्यत प्रस्तावाच्या प्रतीसह (हार्ड कॉपी व सॉप्ट कॉपी मध्ये) उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केलेले आवश्यक नोंदणी शुल्कासह प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा नोंदणी शुल्क जमा न केल्यास आपण सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने तपासणी करण्यात येणार नाही याची सर्व संबधीत संस्थांनी नोंद घ्यावी

क) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून विद्यमान संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे / सुरु असलेल्या अभ्यासक्रमात वाढ – घट, अभ्यासक्रम बंद करणे, पी आय ओ/ एन आर आयच्या जागा, इंटीग्रेटेड अभ्यासक्रम, नावात बदल, महिलासाठींच्या संस्थाचे सर्वसाधारण संस्थेत रुपांतरण इ बाबत ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थापैकी ज्या संस्था उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केलेले आवश्यक नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत अशा संस्थांच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद /वास्तूकला परिषद यांचेकडे पाठविण्यात येणार नाही **याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी व त्यास आपली संस्था सर्वस्वी जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी.**

क. १) विद्यमान संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, पीआयओ/ एनआरआयच्या जागा, इंटीग्रेटेड अभ्यासक्रम इत्यादी करीता परिषेद सादर केलेल्या अर्जाबाबत शासनाचे अभिप्राय पाठविण्याच्या हेतूने मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे कार्यालयात सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनावणीचे वेळापत्रक संचालक कार्यालयाकडून प्राप्त झालेवर या कार्यालयाचे संकेतस्थळावर व मा संचालक यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर सुनावणीसाठी खालील कागदपत्रांचे स्पाईरल बाईडींगचे दोन संच (स्पायलर बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नाव व डीटीई कोड) व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदच्या अर्जात सादर केलेल्या माहितीच्या पृष्ठार्थ दस्ताऐंवज, सन २०१६-१७ चया ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मध्ये नमुद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठार्थ आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह सुनावणीसाठी प्राचार्यानी व्यक्तीशः उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

- संस्थेचा ठराव.
- नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी ॲक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची सांक्षांकीत प्रत
- या पत्रासोबत जोडलेल्या दिनांक २१/०८/२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेले नोंदणीशुल्क अदा केल्याच्या पावतीची सांक्षांकीत प्रत.
- प्राचार्याच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतीची प्रमाणपत्राच्या सांक्षांकीत प्रती.
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या डेफीसिअन्सी रिपोर्ट (**Submitted to R. O. office**)
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची (**Submitted to R. O.**) सांक्षांकीत प्रत.
- ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेतस्थळी माहिती भरल्यानंतर ॲनेक्सर सी व डी ची सांक्षांकीत प्रत
- जमीन , इमारत, ओ. सी. इत्सादी बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत.

क.२) विद्यमान संस्थेतील सध्या सुरु असलेला अभ्यासक्रम बंद करणे (व्दितीयपाळीतील अभ्यासक्रम वगळून) महिलासांठीच्या संस्थेचे सर्वधारण संस्थेत रुपांतरण व विद्यमान संस्थेच्या नावत बदल इ. बाबत संचालनालयात **सुनावणी न घेता** प्रकरणपरत्वे

शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार असून अर्जनिहाय खालील दस्तावेज / कागदपत्रे व्दिप्रतीत मा संचालक कार्यालयात सादर करावयाची आहेत.

विद्यमान संस्थेतील सध्या सुरु असलेला अभ्यासक्रम बंद करणे (व्दितीयपाळीतील अभ्यासक्रम वगळून) सुरु असलेल्या अभ्यासक्रमात घट व विद्यमान संस्थेच्या नावत बदल इ. बाबतच्या प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत

- संस्थेचा ठराव.
- या पत्रासोबत जोडलेल्या दिनांक २१/०८/२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेले नोंदणीशुल्क अदा केल्याच्या पावतीची सांक्षांकीत प्रत.
- संबधित विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र
- विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील या आशयाचे रु १००/- चे नोंदणीकृत लेखी प्रतिज्ञापत्र
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे मान्यता पत्र / मुदतवाढ पत्र

महिलासांठीच्या संस्थेचे सर्वसाधारण संस्थेत रुपांतरण बाबतच्या प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत

- संस्थेचा ठराव.
- या पत्रासोबत जोडलेल्या दिनांक २१/०८/२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेले नोंदणीशुल्क अदा केल्याच्या पावतीची सांक्षांकीत प्रत.
- गत लागोपाठच्या ३ वर्षात ६० टक्के वा त्यापेक्षा कमी प्रवेश असल्याचे प्रमाणपत्र,
- गत लागोपाठच्या ३ वर्षात प्रत्यक्षांत नोंदणी झालेल्या विद्यार्थ्याचे कुलसचिव, संबधीत विद्यापीठ यांचे प्रमाणपत्र.
- संबधीत विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे मान्यता पत्र / मुदतवाढ पत्र

सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी उपरोक्त सर्व प्रस्तावाची एक प्रत आवश्यक त्या कागदपत्रासह (हार्ड कॉपी व सॉप्ट कॉपीमध्ये (सी डी मध्ये)) या कार्यालयात विहीत मुदतीत सादर करावयाची आहे.

सोबत - शासन निर्णय दिनांक २१/०३/२०१३

(डॉ. दि रा नंदनवार)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत — प्रोग्रमार यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

विना अनुदान तत्त्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावाकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्याबाबत

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२

तारीख: २१ ऑगस्ट, २०१३

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांकः **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. सीटीसी-२०११/(प्र.क्र. ४२/११)/तांशि-४, दिनांक २४ .०१. २०१२.**

२) **संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१२/१९७३, दिनांक २०.११.२०१२.**

३) **संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१२/२०७४, दिनांक १४.१२.२०१२.**

४) **संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१३/७०, दिनांक १५.१.२०१३.**

५) **संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१३/१४६, दिनांक ३०.१.२०१३.**

प्रस्तावना —

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या अभ्यासक्रमांबाबत संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्यासाठी आकारावयाचे सुधारीत नोंदणी शुल्क व मुदत ठेवींची रक्कम शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. सीटीसी-२०११/(प्र.क्र.४२/११)/तांशि-४, दि. २४.१.२०१२ अन्वये

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून निश्चित करण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून करण्यात येत आहे. परंतु सदर अंमलबजावणी करताना संचालनालय स्तरावर शासन निर्णयातील पृष्ठ क्र. ३ वर नमूद सुधारीत मुदत ठेव या शिर्षाखालील तक्त्याच्या संदर्भात काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच पी.आय.ओ व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नांवात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ यासाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकनुसार डयुअल पदवी/इंटीग्रेटेड कोर्सेस नव्याने दोन विषयांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. तसेच परदेशी विद्यापीठ/संस्थेच्या संलग्नतेबाबत सुध्दा मुदतठेवीचे शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. हे विचारात घेऊन उपरोक्त शासन निर्णय दि. २४.१.२०१२ मध्ये नमुद केलेल्या अभ्यासक्रमाच्या शुल्काव्यातिरिक्त सुधारीत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव निश्चित करण्यासंदर्भात नव्याने शासन आदेश निर्गमित करण्याची निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय—

पी.आय.ओ व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नांवात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ, दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे यासाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क निर्धारीत करणे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकनुसार डयुअल पदवी/इंटीग्रेटेड कोर्सेस नव्याने दोन विषयांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे. तसेच परदेशी विद्यापीठ/संस्थेच्या संलग्नतेबाबत सुध्दा मुदतठेवीचे शुल्क निर्धारीत करणे, हे विचारात घेऊन सुधारीत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव खालीलप्रमाणे निर्धारीत करण्यात येत आहे :-

स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/महाविद्यालयातील विविध

प्रस्तावांसाठी सुधारीत नोंदणी शुल्क

अ. क्र.	प्रस्तावाचे स्वरुप	ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम			
		मुंबई, ठाणे, नवी मुंबई	पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र	उर्वरीत महानगरपालिका	उर्वरीत महानगरपालिका
१	२	३	४	५	६
१	नवीनअभियांत्रिकी/तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये	रु. २,२५,०००/-	रु. १,५०,०००/-	रु.१,१२,५००/-	रु. ७५,०००/-
२	नवीन अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था	रु. १,५०,०००/-	रु. १,१२,५००/-	रु. ७५,०००/-	रु. ४५,०००/-
३	नवीन अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी/एमबीए/एमएमए स/ एमसीए/पीजीडीएम/ पीजीडीबीएम अभ्यासक्रमाची	रु. १,५०,०००/-	रु. १,१२,५००/-	रु. ७५,०००/-	रु. ४५,०००/-

विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी सुधारीत नोंदणी शुल्क

अ. क्र.	प्रस्तावाचे स्वरुप	ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम			
		मुंबई, ठाणे, नवी मुंबई	पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र	उर्वरीत महानगरपालिका	उर्वरीत महानगरपालिका
१	२	३	४	५	६
१	नवीनअभियांत्रिकी/तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये	रु. २,२५,०००/-	रु. १,५०,०००/-	रु.१,१२,५००/-	रु. ७५,०००/-
२	नवीन अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था	रु. १,५०,०००/-	रु. १,१२,५००/-	रु. ७५,०००/-	रु. ४५,०००/-
३	नवीन अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी/एमबीए/एमएमएस/ एमसीए/पीजीडीएम/ पीजीडीबीएम अभ्यासक्रमाची	रु. १,५०,०००/-	रु. १,१२,५००/-	रु. ७५,०००/-	रु. ४५,०००/-

अ. क्र.	प्रस्तावाचे स्वरुप	ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम			
	पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका महाविद्यालये				
४	सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालये तथा संस्थेत प्रथम वा दुसऱ्या पाळीमध्ये अतिरीक्त/नवीन भ्यासक्रम सुरु करणे व अभ्याक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे	रु. ७५,०००/-	रु. ६०,०००/-	रु. ४५,०००/-	रु. ३७,५००/-
५	अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत नसलेल्या इतर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव व इतर अंशकालीक पदविका वा पदविकोत्तर अभ्यासक्रम	रु. ६०,०००/-	रु. ४५,०००/-	रु. ३०,०००/-	रु. १५,०००/-
६	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालयांचे तथा संस्थांचे स्थलांतरण	रु. १,३५,०००/-	रु. ९०,०००/-	रु. ६७,५००/-	रु. ४५,०००/-
७	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये तथा संस्था बंद करणे	रु. १,३५,०००/-	रु. ९०,०००/-	रु. ६७,५००/-	रु. ४५,०००/-
८	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील	रु. १,३५,०००/-	रु. ९०,०००/-	रु. ६७,५००/-	रु. ४५,०००/-

पृष्ठ ८ पैकी ४

क्र.		ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम			
	अभ्यासक्रमांची दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे				
९	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत पी.आय. ओ. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत	रु. १,३५,०००/-	रु. ९०,०००/-	रु. ६७,५००/-	रु. ४५,०००/-
१०	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत एन.आर. आय. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत	रु. १,३५,०००/-	रु. ९०,०००/-	रु. ६७,५००/-	रु. ४५,०००/-
११	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेतील मंजूर प्रवेश क्षमता कमी करणे/अभ्यासक्रम बंद करणे	रु. ७५,०००/-	रु. ६०,०००/-	रु. ४५,०००/-	रु. ३७,५००/-
१२	सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे	रु. ७५,०००/-	रु. ६०,०००/-	रु. ४५,०००/-	रु. ३७,५००/-
१३	ड्यूअल पदवी/इंटिग्रेटेड कोर्सेस	रु. ७५,०००/-	रु. ६०,०००/-	रु. ४५,०००/-	रु. ३७,५००/-
१४	परदेशी संस्था/विद्यापीठ यांचा सहयोग	रु. ४,५०,०००/-	रु. ३,००,०००/-	रु. २,२५,०००/-	रु. १,५०,०००/-

पृष्ठ ८ पैकी ५

विनाअनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी सुधारीत मुदत ठेव

अ. क्र.	प्रस्तावाचे स्वरुप	प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष
१	पदवी अभ्यासक्रमाची नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये	रु. २२,५०,०००/-	रु. २२,५०,०००/-
२	औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये	रु. १२,००,०००/-	रु. १०,५०,०००/-
३	एमबीए/एमएमएस/एमसीए/पीजीडीएम/पीजीडीबीएम अभ्यासक्रमाची नवीन पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका महाविद्यालये	रु. १०,५०,०००/-	रु. ९,००,०००/-
४	पदविका अभ्यासक्रमाची नवीन तंत्रनिकेतने (अभियांत्रिकी)	रु. ९,००,०००/-	रु. ७,५०,०००/-
५	वास्तुविद्या/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था	रु. ७,५०,०००/-	रु. ७,५०,०००/-
६	संगणक प्रगत अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था	रु. ३,००,०००/-	रु. ३,००,०००/-
७	पदवी/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अतिरीक्त अभ्यासक्रम	रु. ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम	-
८	पदविका अतिरीक्त अभ्यासक्रम	रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम	
९	वाढीव प्रवेश क्षमता/पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका (अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकान्वये निर्धारीत एका तुकडीसाठी)	रु. १,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम	
१०	पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (अंशकालीन)	रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम	

पृष्ठ ८ पैकी ६

अ. क्र.	प्रस्तावाचे स्वरुप	प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष
११	एम.ई./एम.टेक./एम. फार्म इत्यादी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम	रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम	
१२	ड्यूअल पदवी/इंटिग्रेटेड कोर्सेस	रु.४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम	-
१३	परदेशी संस्था/परदेशी विद्यापीठ सहयोग	रु. १,००,००,०००	रु. १,००,००,०००

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०८२११५३७५२५००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Madan Maruti Morve
Date: 2013.08.26 17:01:58 +05'30'

(म. मा. मोरवे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई /नागपूर.
६. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, विभागीय अधिकारी, इंडस्ट्रियल ॲश्युरंस बिल्डींग, २ रा माळा, चर्चगेट, मुंबई.

पृष्ठ ८ पैकी ७